| | |
|---|---|
| **MHKO200009132017** | **नियमीत दरखास्त क्रं. ५३/२०१७ मधील नि.१२४ खाली आदेश**<br>**खंडेराव भाऊ देसाई विरुध्द चंद्रकांत गजानन कदम वगैरे** |

**०१.** प्रस्तुत अर्ज वि.प.क्रं.२ यांनी त्यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे आदेश आदेश रद्द करणेसाठी दाखल केला आहे. वि.प.क्रं.२ यांनी पुढे असे कथन केले आहे की, वि.प.क्रं.२ यांचेविरुध्द पकड वॉरंटचा आदेश झाला होता. सदर आदेशाप्रमाणे वि.प.नं.२ यांना पकडून दि. ०४.१०.२०२१ रोजी दिवाणी तुरुंगात ठेवणेत आले होते. वि.प.नं. २ हे दि. ०४.१०.२०२१ ते दि. ०३.११.२०२१ पर्यंत कळंबा कारागृह, कोल्हापूर येथे वास्तव्यास होते. त्यामुळे वि.प.नं.२ हे कळंबा कारागृहात असलेमुळे सदर कामी म्हणणे दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे वि.प.क्रं. २ यांनी जानुन-बुजून हजर राहणेस टाळाटाळ केलेली नाही. सदरचा अर्ज मंजूर केलेस दरखास्तदार यांचे कोणतही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजूर केलेस वि.प. क्रं.२ यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार असून त्यांना त्यांचे न्याय हक्कापासून वंचीत रहावे लागणार आहे. त्यामुळे वि.प.क्रं.२ यांचे विरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करावा अशी विनंती केली आहे.

**०२.** दरखास्तदार यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्रं.१३६ दाखल केले आहे. त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वि.प. यांनी सदरचा अर्ज कायद्यातील तरतुदीविरुध्द असून तो चालणेस पात्र नाही. वि.प.नं.२ यांस नोटीस लागू होऊनही मे. कोर्टात न हजर राहिलेने व म्हणणे न दिलेने वि.प.नं.२ विरुध्द एकतर्फा काम चालविणेचा आदेश दि. ०१.०४.२०१६ रोजी झाला होता. त्यानंतर वि.प.नं. २ यास दिवाणी कोर्टात ठेवणेबाबत दि. २९.११.२०१६ रोजी दरखास्तदार यांनी अर्ज दिला होता. सदरच अर्जाची नोटीस वि.प.नं.२ यांना पाठविली होती. तरीही वि.प.नं.२ यांनी जाणीवपुर्वक कोणतीही तजवीज केली नव्हती. त्यामुळे वि.प.नं.२

विरुध्द अटक वॉरंट अंमलबजावणीचा आदेश झाला व त्यानंतर वेळोवेळी अटक वॉरंट पाठविणेत आले होते. वि.प.नं.२ यांनी दि.०१.०४.२०१६ इ. रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द होणेसाठी कोणतेही संयुक्तीक कारण न देता नि.क्रं. ८५ ला अर्ज दिला होता परंतु सदर अर्जासोबत म्हणणे दाखल केले नव्हते. त्यानंतर दि. २०.०३.२०२१ रोजी एकतर्फा आदेश रद्द केला व वि.प.नं. २ यांना म्हणणे देणेसाठी संधी दिली होती. त्यानंतर सदरकामी ब-याच तारखा झाल्या होत्या. सदर नेमले तारखेस वि.प. यांनी जाणीवपूर्वक म्हणणे दिले नाही अथवा मुदत मागणी अर्ज दिला नाही.

**०३.** दरम्यानच्या काळात वि.प. नं. २ यांनी वेळोवेळी अर्ज देऊन दि.१८.०२.२०२१ इ. रोजी झालेला तहकुबी आदेश दि. ०४.१०.२०२१ इ. रोजी पर्यंत वाढवून घेतला होता. वर नमुद परिस्थिती असूनही दि. २०.०३.२०२१ रोजी एकतर्फा आदेश रद्द करुन वि.प.नं.२ यांस म्हणणे देणेची संधी दिली होती. पण जाणीवपूर्वक वि.प.नं.२ यांनी सदरकामी म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे वि.प. यांच्या प्रस्तुत अर्जात कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर होणे आवश्यक आहे.

**०४.** दोन्ही बाजूंच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जाचे स्वरुप लक्षात घेता वि.प.नं.२ विरुध्द झालेला विना म्हणणे आदेश रद्द करुन सदर वि.प.नं.२ यांना त्यांची बाजू मांडण्यासाठी सदरचा अर्ज मंजूर करणे उचित होणार आहे. तसेच अर्जाची सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे तसे न केल्यास अर्जात गुंतागुंत निर्माण होऊन अर्जाच्या निर्णय देताना अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे अर्जाच्या निर्णयाच्या कामी सुलभता येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करणे उचित होईल. त्यामुळे वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**०६.** अंतिमरित्या मी खालील प्रमाणे आदेश करते.

**आदेश.**

१. नि.क्रं.१२४ चा अर्ज मंजूर करण्यात आला.

२. वि.प.क्रं.२ विरुध्द झालेला 'विना म्हणणे आदेश' रद्द करण्यात आला.

३. वि.प.नं.२ यांनी दरखास्तदार यांना रक्कम रु.१०००/- कॉस्ट देणेत यावी.

Honey Mukesh Patel
Digitally signed by Honey Mukesh Patel
Date: 2024.11.21 15:19:03 +0530

दि.२२.११.२०२४.
कळे-खेरीवडे.

(एच.एम.पटेल)
अति.सह.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
कळे-खेरीवडे.